‘‘स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय ग्रंथालयातील अध्ययन व संशोधनास प्रेरक उपक्रमांचा अभ्यास’’

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयाच्या

पीएच.डी. (Ph.D.) पदवीसाठी

सादर करावयाचा

शोध प्रबंधाचा आराखडा

संशोधक
श्री.विठ्ठल विश्वनाथ जाधव
(ग्रंथपाल)
दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर

मार्गदर्शक
डॉ.विक्रम व्ही. गिरी
(ग्रंथपाल)
शहीद भगतसिग महाविद्यालय, किल्लारी
ता.औसा जि.लातूर

२०१९

अनुक्रमणिका

अ.क्र.	नाव	पान नं.
01	प्रस्तावना	01
02	विषय निवडीमागील भूमिका, आवश्यकता व अपेक्षित उपलब्धी	04
03	उद्दिष्टे :	04
04	संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :	05
05	पूर्वानुमान /गृहितके :	05
06	संशोधन पध्दती :	05
07	माहिती संकलनाची साधने :	07
08	संभाव्य प्रकरणांची रूपरेषा :	09
09	संशोधन कार्याचे नियोजन	09
10	संदर्भ	10

प्रस्तावना :

आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. माहितीच्या उपभोक्त्यांच्या माहितीविषयक गरजामध्ये व उपभोक्त्यांच्या वाचन विषयक सवयीमध्ये दिवसेंदिवस बदल होत आहेत. ग्रंथालये आणि माहिती केंद्रे मुद्रित तसेच इलेक्ट्रॉनिक वाचनसाहित्यसंग्रह विकसित करतात. संकलित वाचनसाहित्याची योग्य पध्दतीयने मांडणी व देखभाल करतात व ग्रंथालयातील वाचनसाहित्य संग्रहाच्या मदतीने उपभोक्त्यांना विविध प्रकारच्या सेवा पुरवितात. उपभोक्त्यांना त्याच्या गरजांची पूर्तता होईल, असे वाचन साहित्य आणि माहिती सेवा पुरविणे, याच प्रमुख हेतूसाठी ग्रंथालये आणि माहिती केंद्रे कार्यरत असतात. त्याचबरोबर उपभोक्त्यांना वाचन विषयक व माहिती विषयक सल्ला देण्याचे कार्यही ग्रंथालये आणि माहिती केंद्रे करतात. ग्रंथालये करत असलेल्या कार्यांमध्ये आणि देत असलेल्या सेवांमध्ये गुणवत्ता यावी, ग्रंथालयीन सेवा अधिक परिणामकारक व्हाव्यात, अशी ग्रंथालय उपभोक्त्यांची अपेक्षा असते. उपभोक्त्यांना परिणामकारक सेवा द्याव्यात, असे ग्रंथालय सेवकांनाही वाटत असते. ग्रंथालय सेवा व प्रेरक उपक्रमामध्ये परिणाम कारकता आणण्यासाठी संशोधन करणे आवश्यक आहे.

अध्ययन व संशोधनामध्ये ग्रंथालयाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. परंतु विविध ग्रंथालयाच्या ग्रंथपालांच्या संपर्कातून असे लक्षात येते की, ग्रंथालयामध्ये अध्ययन व संशोधनास प्रोत्साहन देण्याची पुरेशी व्यवस्था नसते. विद्यार्थी, प्राध्यापक अथवा महाविद्यालय बाहय बहिस्थ: वाचक असो त्यास ग्रंथालयाच्या माध्यमातूनअध्ययनासाठी व संशोधनासाठी प्रोत्साहन मिळाले पाहिजे. प्रस्तुत अभ्यासामध्ये सद्यस्थितीत ग्रंथालयामध्ये असे प्रोत्साहन कसे दिले जाते. हे समजून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच अशा प्रोत्साहनपर सूक्ष्म अध्ययन करून त्याचे स्वरूप लक्षात घेतले आहे. अशा प्रोत्साहनपर उपक्रमाचे यशापयश त्यांची फलनिष्पत्ती पाहून अभ्यासलेले आहे. प्रोत्साहनपर उपक्रम व कार्यपध्दतीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करून काही निष्कर्षावरही अभ्यासक येणार आहे. अध्ययन संशोधनास अभ्यासकांना अधिकाधिक प्रेरणा देण्यासाठी आणखी काय काय करता येईल याचेही विवेचन या अभ्यासात अपेक्षित आहे.

अध्ययन संशोधनास प्रेरणा देण्याकरिता ग्रंथालयातील भौतिक व्यवस्था आणि या बरोबरच ग्रंथालयीन मनुष्यबळातील क्षमता यांचाही अनिवार्यपणे संबंध येतो. प्रस्तुत अभ्यासात

मनुष्यबळामधील विद्यमान क्षमता तपासली जाणे अपेक्षित आहे. आणखी काही अपेक्षित क्षमता निर्माण होण्यासाठी ग्रंथालयीन मनुष्यबळाचे प्रशिक्षण व प्रबोधन कसे व्हावे याचेही चिंतन या अभ्यासात अपेक्षित आहे. या सर्व अभ्यसाचा परिपाक म्हणून ग्रंथालयीन सेवा व सुविधांची गुणवत्ता कशी अधिकाधिक विकसीत होईल याचाही विचार या अभ्यासात समाविष्ट आहे. ग्रंथालयीन सेवा व संसाधने यांचे उपयोजन अध्ययन संशोधनाचा दृष्टीने अभ्यासकांकडून अधिकाधिक कसे होईल याचाही विचार या अभ्यासात होणे अपेक्षित आहे.

विषय निवडीमागील भूमिका, आवश्यकता व अपेक्षित उपलब्धी :

१. अध्ययन व संशोधनास चालना देण्यासाठी ग्रंथालयांची विद्यमान क्षमता समजून घेण्यासाठी आवश्यक.
२. अध्ययन- संशोधनास अभ्यासकांना प्रवृत्त करण्यासाठीच्या योजनांचे नेमके स्वरूप समजून घेण्यासाठी आवश्यक.
३. अध्ययन- संशोधनास चालना देण्याच्या उपक्रमांची वास्तव फलनिष्पत्ती समजण्यास आवश्यक.
४. अध्ययन- संशोधनास अभ्यासक अधिकाधिक प्रेरीत होण्यासाठी योजलेल्या उपक्रमांचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन होण्यासाठी आवश्यक.
५. ग्रंथालयीन मनुष्यबळात अध्ययन-संशोधन केंद्रित दृष्टिकोन विकसीत होण्यासाठी आवश्यक.
६. ग्रंथालयातील सर्व सेवा व सुविधांचे अभ्यासकांनी अध्ययन - संशोधनासाठी उपाययोजना करण्यासाठी आवश्यक.

उद्दिष्टे :

- स्वा.रा.ती.म. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या सद्यस्थितीचा आढावा घेणे.
- सदरील ग्रंथालयातील अध्ययन व संशोधनास प्रेरक उपक्रमांची माहिती घेणे.
- सदरील ग्रंथालयामधील अध्ययन-संशोधनास प्रेरक उपक्रमांच्या यशापशांचे मूल्यमापन करणे.
- सदरील ग्रंथालयातील अध्ययन-संशोधनास प्रेरक उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपाययोजना सुचविणे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

अ) व्याप्ती :

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती स्वमी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न कला, वाणिज्य व विज्ञान अनुदानित महाविद्यालय ग्रंथालयापुरती आहे.

ब) मर्यादा :

प्रस्तुत संशोधनाच्या कालखंडाची मर्यादा इ.स.२०१५-१६ते २०१९-२० या पाच शैक्षणिक वर्षातील ग्रंथालयामध्ये उपलब्ध असलेल्या माहितीवरच आधारित आहे.

पूर्वानुमान /गृहितके :

- स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड संलग्न महाविद्यालयीन ग्रंथालयाची सद्यस्थिती समाधानकारक आहे.
- सदरील ग्रंथालयातील अध्ययन व संशोधनास प्रेरक उपक्रम राबविले जातात.
- सदरील ग्रंथालयातील अध्ययन व संशोधन प्रेरक उपक्रमांच्या यशापयशाचे मूल्यमापन करता येते.
- सदरील ग्रंथालयातील ग्रंथपाल व सेवकांमध्ये अध्ययन व संशोधन प्रेरक नवनवीन, अद्ययावत उपक्रम सुचण्याची सृजनशीलता आहे.

संशोधन पध्दती :

व्यक्तीला एखादया वस्तूच्या, घटनेच्या बाबतीत सर्वच माहित असेल असे नाही. त्यासाठी व्यक्तीचे शोध घेण्याचे प्रयत्न अखंड चालू आहेत. ज्ञानाची वृध्दी करणे, अस्पष्ट ज्ञानाचे स्पष्टीकरण करणे आणि त्याची विद्यमान ज्ञानाचे सत्यता पडताळणे. हे संशोधनाचे उद्देश आहेत. मानव हा बुध्दीजीवी व जिज्ञासू वृत्तीचा प्राणी असल्यामुळे तो नवीन ज्ञानाच्या शोधात असतो. संशोधनाकरीता गृहित कृत्याचे परीक्षण करणे, नवीन घटनांचा शोध घेणे, विशिष्ट घटनांचा शोध घेणे, विशिष्ट घटनांमधील नवीन संबंध शोधण्याच्या उद्देशाने कोणत्यातरी संशोधन पध्दतीचा उपयोग करणे हा संशोधनाचा अर्थ आहे.

वेबस्टर डिक्शनरीनुसार ''संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञानशाखेत नवीन तथ्य शोधण्यासाठी आणि जुनी तथ्य आणि तत्वे परिक्षणांसाठी केलेला चिकित्सक व पध्दतशीर अभ्यास होय.''

चार्ल्स बुशा आणि स्टिफन हार्टर यांच्या मते, ''संशोधन म्हणजे ज्ञानप्राप्तीसाठी घेतलेला शोध होय''

सदरील संशोधनात वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब केला जाणार असून मुलाखत व प्रश्नावलीचा अवलंब केला जाणार आहे.

अ) वर्णनात्मक संशोधन पध्दती :

वर्णनात्मक संशोधन पध्दती ही सर्व पध्दतीमध्ये अत्यंत लोकप्रिय पध्दती असून या पध्दतीचा मोठया प्रमाणावर उपयोग केलेला दिसून येतो. जास्तीत जास्त ग्रंथालयीन समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. या पध्दतीच्या आधारे केवळ समस्या सोडविणे एवढेच उद्दिष्ट न ठेवता मूलभूत सिंध्दातासाठी माहिती मिळविणे, मूलभूत तत्त्व शोधणे हे देखील उद्दिष्टे ठेवली जातात. याप्रमाणेच या पध्दतीचे आणखी एक वैशिष्टे म्हणजे या प्रकारात प्रयोज्य ज्या स्थितीत आहे, घटक ज्या स्थितीत आहे, त्या स्थितीतच त्या प्रयोज्याचा घटकाचा विचार अभ्यास केला जातो. या स्थितीमध्ये बदल केला जात नाही.

वर्णनात्मक संशोधनात समस्येच्या संदर्भात, माहिती गोळा करण्यासाठी प्रश्नावली, मुलाखती, कसोटया, निरिक्षण वगैरे अनेक साधनांचा उपयोग करता येतो. माहती कोणत्या प्रकारची हवी आहे व प्रतिसादक दर्जा कसा आहे, यावर कोणते साधन वापरायचे हे ठरवावे लागते.

ब) मुलाखत :

मुलाखत हा एक मौखिक प्रकार आहे. संबंधित व्यक्तीशी प्रत्यक्ष संभाषण अथवा गप्पा गोष्टी करून संशोधन विषयासंबंधी तथ्य संकलित करण्याच्या क्रियेस मुलाखत असे म्हणतात. या पध्दतीचा विचारांचे ठराविक प्रश्न निवडून उपभोक्त्यांना त्या प्रमाणे विचारण्यात येतात किंवा वेळेवर उपभोक्त्यांच्या स्वभावानुसार प्रश्न विचारले जातात. उपभोक्त्यांना अशा प्रकारे मुलाखत घेऊन प्रश्नाव्दारे माहिती मिळविणे ही एक महत्त्वपूर्ण पध्दती आहे. त्या पध्दतीचा महत्त्वाचा फायदा असा की

उपभोक्त्याच्या प्रकारानुसार कमी जास्त सोईनुसार प्रश्न विचारले जावू शकतात. त्यामुळे मिळणारे उत्तर ही बोलकी आणि वास्तववादी अशा प्रकारचे असते.

क) प्रश्नावली :

तथ्य संकलनाचे महत्त्वाचे साधन आहे. Field Study मध्ये प्रश्नावलीत महत्त्वाचे कार्य करते. संशोधनाचे क्षेत्र मोठे असल्यास प्रश्नावलीचा उपयोग होतो. त्यावेळी निरीक्षण, मुलाखत या तंत्राची उणिव प्रश्नावली भरून काढते. प्रश्नावली पोस्टाने पाठविली जाते व तथ्य संकलनास त्याची मदत होते. संशोधन क्षेत्र विशाल असले तर प्रश्नावलीच्या सहायाने आवश्यक तथ्य घरी बसून प्राप्त करता येतात. प्रश्नावलीत अप्रत्यक्ष संपर्क साधता येतो.

माहिती संकलनाची साधने :

सदरील संशोधनात प्रामुख्याने मुलाखती, अनुसूची व प्रश्नावली या साधनांचा वापर माहिती संकलनासाठी केला जाईल.

माहिती संकलनाची तंत्रे :

पाहणी, प्रत्यक्ष निरिक्षण सहभागी निरिक्षण, सामुदायिक रेकॉर्ड व त्याचे विश्लेषण या सर्व प्रकाराचा समावेश होईल.

पूर्व साहित्याचा शोध :

शोध प्रबंधाचा आराखडा तयार करीत असताना खालील पूर्व साहित्याचा शोध घेण्यात आला आहे.

१. आधुनिक ग्रंथालय व्यवस्थापन , सत्यप्रकाश निकोसे : सदर ग्रंथातून ग्रंथालय कर्मचारी यांच्याबाबत समोपदेशन आदींची माहिती झाली.

२. ग्रंथालय विकासदर्शन, गंगाधर पारखी: सदर ग्रंथातून संगणकीकरण, ग्रंथालयाचा इतिहास, तंत्रज्ञानाचा इतिहास आदीची माहिती जाणून घेतली.

३. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन, कुंभार, राजेंद्र : संशोधन आराखडा तयार करीत असताना संशोधनाबाबत चा दृष्टीकोन डॉ.राजेंद्र कुभांर यांच्या पुस्तकातून मिळाला. प्रस्तावनेपासून संशोधन पध्दती पर्यंत या पुस्तकाचा आधार घेतलेला आहे.

४. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विविध पैलू, वसंत वि.लेले : या ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचे विविध पैलू समजून घेण्यास मदत झाली.

५. ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण , द.ना.फडके : सदर ग्रंथालयातून संगणकीकरण, वेबसाईट आदीबाबत माहिती जाणून घेतली.

६. संशोधन पध्दती, वा.भा.पाटील : सदर ग्रंथातून संशोधन पध्दतचीची माहिती घेतली. त्यापैकी वर्णनात्म संशोधन पध्दती, साधने, तंत्रे इत्यादीबाबत आराखडयमधे माहिती आली आहे.

7. Jotwani, D. (2008). Best Practices in a Modern Library and Information Center - The Case of Central Library, IIT Bombay. 6th International CALIBER 2008. Allahabad: University of Allahaad.

8. Prabhakar, S.V.R. (2017). Best Practices adopted in Academic Libraries and Information Centers: At a Glance, International Journal of Librarianship and Administration

9. Sathe, Vivek Sampatrao, Best Practices In The College Libraries, "Knowledge Librarian"- An International Peer Reviewed Bilingual E-Journal of Library And Information Science

10. Vyas, S. D. (2009). Best Practices In Academic Libraries In India: A Study. *International Conference on Academic Libraries(ICAL09).* New Delhi

11. Wagmode, Shivaji Shankar, Best practices in Sonubhau Baswant College Library: A Study

12. http://www.abc-clio.com/ODLIS/odlis_b.aspx

संभाव्य प्रकरणांची रूपरेषा :

अ.क्र.	प्रकरणाचे नाव
१.	प्रास्ताविक
२.	पूर्व अभ्यासाचा आढावा
३.	संशोधन पध्दती
४	माहिती विश्लेषण
(अ)	अध्ययन संशोधनास चालना देणारे उपक्रम
(ब)	अध्ययन संशोधनास प्रेरक उपक्रमांच्या फलनिष्पत्तीचे मूल्यमापन
(क)	अध्ययन संशोधनाच्या दृष्टीकोनातून ग्रंथालयीन मनुष्यबळाच्या क्षमतांचे मूल्यमापन
५.	अध्ययन संशोधनास चालना देण्याच्या संदर्भात ग्रंथालयाची अपेक्षित भूमिका
६.	निष्कर्ष व शिफारसी

संशोधन कार्याचे नियोजन:

अ.क्र	**संशोधन कार्याचा तपशिल**	**कालावधी**
१	पूर्वसाहित्याचा आढावा घेणे, संशोधनावरील पुस्तकाचे वाचन करणे	**६ महिने**
२	स्वारातीम विद्यापीठाशी संलग्नित अनुदानित महाविद्यालयीन ग्रंथालयामध्ये कोणकोणते अध्ययन व संशोधनास प्रेरक उपक्रम घेतले जातात यांची माहिती मिळविणे	**६ महिने**
३	प्रश्नावली तयार करून विद्यार्थी व ग्रंथपाल यांना पाठविणे	**६ महिने**
४	संबधीत प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती गोळा करणे	**६ महिने**
५	संकलीत माहितीचे विश्लेषण करणे	**६ महिने**
६	संशोधन अहवाल तयार करून सादरीकरण करणे	**६ महिने**

संदर्भ :

१. क्‍हाडे, बी.एम., शास्त्रीय संशोधन पध्दती, नागपूर, पिंपळापुरे ॲण्ड पब्लिशर्स, २००७
२. नरगुंदे रेवती (२००८), ग्रंथालय आणि सामाजिक विकास, कोल्हापूर.
३. नेमाडे, भालचंद्र. वाचन हा माणसाचा महत्वाचा अवयव. ‘अनुभव’. फेब्रुवारी२०१७
४. पवार, एस. पी., बडकत्ते, सविता, पवार, आर. जी., जाधव, सुनंदा आणि कुलकर्णी, एम. व्ही. ग्रंथालय व माहितीशास्त्र. सु.३ री आ. कोल्हापूर : फडके प्रकाशन, सप्टेंबर २००९.
५. फडके, द.ना. (२०१२), ग्रंथालय संगणकीकरण व आधुनिकीकरण, पुणे.
६. बाहेती, एस. आर. ‘महाविद्यालयीन ग्रंथालयामध्ये माहिती साक्षरता कार्यक्रम’‘ज्ञानगंगोत्री’. सप्टे-ऑक्टो-नोव्हे(२००६)
७. भांडारकर, पु.ल. सामाजिक संशोधन पध्दती, औरंगाबाद, महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथनिर्मिती मंडळ, १९७६.
८. लांजेवार, नरेंद्र. ग्रंथालयांना अनास्थेची कीड ‘अनुभव’. जुलै२०१२
९. शिंदे, ललित मनोहरराव, मराठवाडा संशोधन मंडळ, लातूर: एक अभ्यास: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, २००३.
१०. http://www.srtmun.ac.in/en/

श्री.विठ्ठल जाधव
संशोधक विद्यार्थी

डॉ.विक्रम व्ही. गिरी
मार्गदर्शक